




दैनिक

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

vadalvartanews@gmail.com



**गाव तेथे वार्ताहर**

महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा, तालुका, शहर आणि ग्रामीण भागात

वार्ताहर/पत्रकार आणि जाहिरातदार नेमणे आहेत.

वादळ वार्ता

या लोकप्रिय दैनिक वृत्तपत्राकरिता महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा, तालुका, शहर आणि ग्रामीण भागात प्रतिनिधी नेमणे आहेत. इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा.

दैनिक वादळ वार्ता

जॉईन झालेल्या प्रत्येक प्रतिनिधींना आय कार्ड आणि नियुक्ती पत्र दिले जाईल.

* पात्रता *

समाजसेवेची आवड, जनसंपर्क, फोन असणे आवश्यक ,सोशल मीडियाचा वापर करता येणे

दैनिक वादळ वार्ता

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे एकमेव विभागीय निर्भीड दैनिक

मो.न.9422660077



●मुख्य संपादक : अजय भांगे ●कार्यकारी संपादक : रमेश गुळभिले https://epaper.vadalvarta.com मो.न. ९४२२६६००७७

● बीड/महाराष्ट्र ● सोमवार २९ जूले २०२४ ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष १ ले ● अंक ३४७ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये


# मी शपथ घेतो की:, विधानपरिषदेतील नवनिर्वाचित ११ उमेदवारांनी घेतली शपथ




**विशेष प्रतिनिधी ,**
भाजपच्या नेत्या पंकजा मुंडे यांच्यासहीत विधान परिषदेच्या 11 सदस्यांनी पद आणि गोपनीयतेची शपथ घेतली. त्यानंतर या नेत्यांनी प्रतिक्रिया देण्यास सुरुवात केली आहे. आमदारकीची शपथ घेतल्यानंतर पंकजा मुंडे यांनी थेट मंत्रीपदावर भाष्य केलं आहे. त्यामुळे पंकजा मुंडे यांचं मंत्रिमंडळात पुन्हा कम बॅक होणार आहे का? अशी चर्चा रंगली आहे. पंकजा मुंडे यांनी आमदारकीची शपथ घेतली. त्यानंतर त्यांनी मीडियाशी संवाद साधला. यावेळी मंत्रिमंडळात कॅमबॅक होणार का? असा सवाल त्यांना करण्यात आला. त्यावर पंकजा मुंडे यांनी थेट प्रतिक्रिया व्यक्त केली. या राज्यात जे निर्णय होतात. त्यामध्ये ही चर्चा राहत असते. माझ्याही नावाची चर्चा आहे. जे निर्णय होईल ते तुम्हीही पाहाल, मीही पाहील. बघू काय होते ते, असं पंकजा मुंडे म्हणाल्या.म्हणून त्यांना नमस्कारदरम्यान, शिंदे गटाच्या नेत्या भावना गवळी यांनीही शपथ घेतल्यानंतर मीडियाशी संवाद साधला. परिषद सदज्य म्हणून शपथ घेतली. एकनाथ शिंदे यांचे जाहीर आभार व्यक्त करते. राज्यातील विषय धडाडीने मार्गी लावायचे आहेत. महिला, युवकांचे अनेक प्रश्न सोडवण्याचा माझा प्रयत्न असणार आहे. आता सामान्य माणसांची लढाई या विधानभवनात पाहायला मिळेल. महिला, शेतकरी यांच्यासाठी योजना ज्या राबवल्यात त्याला न्याय देणार आहे, असं भावना गवळी म्हणाल्या. शपथ घेताना भावना गवळी या जय एकनाथ म्हणाल्या. त्यावरही त्यांनी प्रतिक्रिया व्यक्त केली. नाथांचे नाथ... त्यांना नमस्कार... त्याच्यामुळे मी सभागृहात आहे... दिल्लीतून या विधानभवनात आले म्हणून मी जय एकनाथ म्हणाले..., असं भावना गवळी म्हणाल्या. मनोज जरांगे यांचा विषय सोडवायला राज्य सरकारने पुढाकार घेतला आहे. खुल्या पद्धतीने चर्चा करावी. सर्व एकत्र आल्याशिवाय प्रश्न सुटणार नाही. इश्यू न करता मार्गे निघू शकतो. एकत्र येऊन काम केलं पाहिजे, असा मंत्र एकनाथ शिंदे यांनी दिलाय, असंही त्या म्हणाल्या. शेतकऱ्यांना न्याय देणारशेतीच्या बांधावरून विधानभवनाच्या बंधावर मला उभे केले आहे. मी सर्व शेतकऱ्यांना न्याय देणार आहे, असं आमदार सदाभाऊ खोत यांनी शपथ घेतल्यावर सांगितलं. देवेंद्र फडणवीस यांनीच मराठा समाजाला न्याय दिला आहे. शरद पवार यांनी समाजाची माती केली. फडणवीसांनी तर दोनदा मराठा समाजाला न्याय दिला, असं खोत म्हणाले.महाराष्ट्रातील विधान परिषद निवडणुकीचे निकाल लागले आहेत. या निवडणुकीत महायुतीने महाविकासआघाडीला धोबीपछाड दिली. विधानसभेत 11 जागांसाठी उभे असलेल्या 12 उमेदवारांपैकी शेकापच्या जयंत पाटील यांचा पराभव झाला आहे. तर इतर 11 उमेदवार हे विजयी झाले. आता विधान परिषदेमधील नवनिर्वाचित 11 आमदारांचा शपथविधी पार पडला. विधान परिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे यांनी सर्व विजयी उमेदवारांना शपथ दिली

## शिक्षण सप्ताह अंतर्गत श्री सिद्धेश्वर माध्यमिक विद्यालयात दप्तराविना शाळा उपक्रम उत्साहात संपन्न

### सांस्कृतिक कार्यक्रम व विद्यार्थ्यांनी आपल्या अंगी असलेल्या विविध कला गुणांचे सादरीकरण

**बीड प्रतिनिधी ,**
माजलगाव- शिक्षण सप्ताह अंतर्गत शनिवार रोजी ५ वी ते ७ व ८ वी ते १० वी या दोन्ही विभागात 'दप्तराविना शाळा' हा उपक्रम शाळेचे मुख्याध्यापक संतोष लिंबकर सर व उपमुख्याध्यापक विठ्ठल काळे सर यांच्या मार्गदर्शनाखाली अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला.

यावेळी माता सरस्वती व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. नंतर गायन, वादन, नृत्य, चित्रकला अशा विविध प्रकारचे




कलागुणांना प्रोत्साहन मिळावे या हेतूने असंख्य विद्यार्थ्यांनी या उपक्रमात सहभाग घेतला होता. यामध्ये भक्ती गीते, गौळणी, भारुडे, लोकगीते या गीत प्रकारावर वर्ग शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली नृत्य बसविण्यात आले होते त्या गीताचे सादरीकरण करण्यात आले. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी पर्यवेक्षक रवींद्र खोडवे, सदाशिव ढगे, कमलाकर झोडगे, परमेश्वर आदमाने, अभ्यासपुरक मंडळ प्रमुख श्रीमती अपर्णा मुळे, श्रीमती अंजली वाघमारे यांच्यासह सर्व वर्गशिक्षक, संगीत, कला, क्रिडा तसेच विस्तार कार्य विभाग प्रमुख विशाल ठोसर, सर्व विषय शिक्षक यांनी परिश्रम घेतले. या उपक्रमातून विद्यार्थ्यांनी आनंद घेतला.

## शैलेंद्र पोटभरे यांची रिपाई एकतावादी च्या मराठवाडा अध्यक्ष पदी निवड




**बीड/प्रतिनिधी** मुंबई ठाणे येथे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया एकतावादीची राष्ट्रीय कार्यकारणी व महाराष्ट्र कार्यकारणीची बैठक दिनांक 28 जुलै , रोज रविवार घेण्यात आली. या बैठकीस रिपाई एक्कावादीचे राष्ट्रीय नेते नानासाहेब इंदिसे व राष्ट्रीय उपाध्यक्ष दौलत रामजी साहेब दिल्ली राहुल भूल नागपूर रिपाई राष्ट्रीय कार्याध्यक्ष जितेंद्र कुमार इंदिसे युवा नेते भैय्यासाहेब इंदिसे महाराष्ट्र अध्यक्ष विकास निकम यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये पक्ष संघटन व कार्याची दखल घेत रिपाई एकतावादी चे बीड जिल्हा अध्यक्ष शैलेंद्र पोटभरे यांची मराठवाडा प्रदेश अध्यक्षपदी निवड करण्यात आली असून निवड झाल्याबद्दल त्यांच सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

# साने गुरुजी निवासी विद्यालयात शिक्षण सप्ताह उत्साहात साजरा

**केज/ प्रतिनिधी**
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग महाराष्ट्र शासन यांच्या वतीने आयोजित राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० च्या चौथ्या वर्धापन दिनानिमित्त दिनांक २२ जुलै ते २८ जुलै २०२४ या कालावधीत शिक्षण सप्ताह साजरा करणे बाबत कळविण्यात आले होते शिक्षण सप्ताहात आठवड्याच्या प्रत्येक दिवस एका विशिष्ट अभ्यासक्रमासाठी नियोजित करण्यात आला होता ज्यात शिक्षण व विकासाच्या विविध पैलूंचा समावेश आहे १)अध्ययन अध्यापन साहित्य दिवस २) संख्या ज्ञान व साक्षरता दिवस ३) क्रीडा दिवस ४) सांस्कृतिक दिवस ५) कौशल्य व डिजिटल उपक्रम दिवस ६) मिशन लाईफ चंद्रची शेतात एको क्लब /शालेय पोषण दिवस ७) समुदाय सहभाग दिवस या उपक्रमाने सप्ताह साजरा करण्यात आला पहिल्या दिवशी शिक्षकाने आपापल्या विषयाचे स्वतः शैक्षणिक साहित्य बनवून विद्यार्थ्यांना कृतीयुक्त अध्यापन केले तसेच दुसऱ्या दिवशी अध्ययन स्तर निश्चित करून त्यांच्यामध्ये एफएलएम पूर्ण करण्याच्या दृष्टीने नियोजन करून पूर्ण करण्याचा संकल्प केला. तसेच तिसऱ्या दिवशी क्रीडाच्या माध्यमातून देशी




खेळांना प्राधान्य देऊन विद्यार्थ्यांमध्ये खेळाची आवड निर्माण केली तसेच लोकगीत शेतकरी गीत पोवाडा कथाकथन काव्यवाचन देशभक्तीपर गीत यांचे सादरीकरण करून सांस्कृतिक दिन साजरा केला यातून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यात आला तसेच इको क्लब च्या माध्यमातून पर्यावरणाचे महत्त्व पटवून देऊन तीस देशी वृक्षांचे वृक्षारोपण व प्रधानमंत्री पोषणशक्ती च्या माध्यमातून आपल्या शरीराचा शरीराला आवश्यक पोषणतत्वे चे महत्व प्रोटीन व्हिटॅमिन कार्बोहायड्रस फॅट इत्यादीच्या माध्यमातून पटवून दिले तर दिनांक २८ /८/२०२४ रोजी पालक शिक्षक दानशूर व्यक्ती यांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना तीर्थ भोजन देण्यात आले असे उत्कृष्ट नियोजन करून साने गुरुजी निवासी विद्यालयामध्ये संस्थेचे पदाधिकारी एडवोकेट उद्धवराव कराड, राजेश कापसे, प्राचार्य डॉक्टर कविता गित्ते मॅडम, विभागप्रमुख सिरसट मॅडम ,सहाय्यक पवार सर व सर्व शिक्षक विद्यार्थी पालक यांच्या सहकार्याने हा सप्ताह उत्साहात साजरा करण्यात आला.

# रोटरी क्लब ऑफ बीडकडून वारकर्यांची आरोग्य तपासणी निमा, वैद्यकीय प्रतिनिधी संघटनेचाही सहभाग; चारशे वारकर्यांनी घेतला लाभ

**बीड : प्रतिनिधी**

संत गजानन महाराज यांची पालखी कंकालेश्वर मंदिरात मुक्कामी आहे. या दिंडीतील वारकऱ्यांसाठी रोटरी क्लब ऑफ बीड, निमा संघटना व बीड जिल्हा वैद्यकीय प्रतिनिधी संघटनेच्या वतीने आरोग्य तपासणी व मोफ त औषधोपचार शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबीराचा चारशेहून अधिक वारकऱ्यांनी सहभाग घेतला.




संत गजानन महाराज यांची दिंडी शेगावकडे परत जातांना बीड मुक्कामी आहे. या दिंडीतील सहभागी वारकऱ्यांसाठी रोटरीच्या वतीने आरोग्य तपासणी व मोफ त औषधोपचार शिबीर घेण्यात आले. यावेळी अध्यक्ष डॉ.मेघराज पिंगळे, सचिव संदीप खोड, निमा संघटनेचे अध्यक्ष डॉ. अजित जाधव , वैद्यकीय प्रतिनिधी संघटनेचे अध्यक्ष जगन्नाथ निकम, प्रमोद निनाळ, अक्षय शेटे, मेडिकल कमिटी चेअरमन राम मोटवानी, अमर डागा, संतोष पवार, सुमित जयस्वाल, सुहास बेंद्रे, विवेक बडगे, प्रमोद करमाळकर, परमेश्वर जाधव, संकेत कदम, उदय नागरगोजे, संतोष सुतार, रत्नाकर क्षिरसागर, कल्याण कुलकर्णी, सुभाष हुंबे, डॉक्टर अमोल जोगदंड, सुरज लाहोटी, वैद्यकीय प्रतिनिधी संघटनेचे प्रशांत घुगरे, भारत गिरी, रणविजय संतोष बाफना, विकास होके, अण्णा शेळके यांची प्रमुख उपस्थिती होती. आरोग्य तपासणीत यांचे योगदान डॉ.अजित जाधव, डॉ.रमेश घोडके, डॉ.कैलास दोन, डॉ.विजय मोराळे, डॉ. शंकर खाडे, डॉ.विनय जोशी, दुर्गेश जोशी, डॉ.अतुल जोशी, डॉ.मनोज पोहणेरकर, डॉ.वरद चरखा, डॉ.सुहासिनी जाधव, डॉ.उर्मिला घोडके, डॉ.वैशाली कुलकर्णी, डॉ.पोहनेरकर, डॉ.खाडे, डॉ. मोराळे मॅडम यांनी वारकऱ्यांची आरोग्य तपासणी केली.

-------

# उघडे पडलेल्या जगताप कुटूंबाला तेजसचा मदतीचा हात: सुरेश आण्णा अपघात योजनेंतर्गत दिला चार लाखाचा धनादेश

**बीड : प्रतिनिधी**

: ऊसतोडीच्या कामासाठी गेलेल्या बाळू जगताप आणि महादेव जगताप (रा.डोमरी, ता.पाटोदा) येथील दोन्ही बंधूंचा अपघातात मृत्यू झाला होता. यातील मयत बाळू जगताप हे तेजस अर्बन संस्थेचे सभासद असल्याने या बँकेने त्यांच्या वारसांना चार लाख रूपयांचा मदतीचा हात दिला आहे. 'मा.सुरेश आण्णा ' अपघात योजनेतून ही मदत शनिवारी करण्यात आली. तेजस अर्बन संस्थेने जिल्हाभरात जाळे निर्माण केलेले असून सभासद असलेल्यांच्या कुटूंबियांना अचानक मृत्यूमुळे येणाऱ्या अडचणी लक्षात घेवून सभासदांचा मा.सुरेश आण्णा , या नावाने अपघात विमा उतरविला आहे. यातून ही मदत करण्यात येत आहे. काही महिन्यांपुर्वी डोमरी येथील बाळू लक्ष्मण जगताप आणि महादेव जगताप या दोन्ही मुकादम बंधूंचा ऊसतोडीच्या कामासाठी सातारा जिल्हातील साखर कारखान्यावर गेल्यानंतर दुचाकी अपघातात मृत्यू झालेला होता. दरम्यान, बाळू जगताप




यांची आर्थीक परस्थिती हालाखीची असून ते तेजस अर्बन संस्थेचे सभासद आहेत. सदरील बाब लक्षात घेवून संस्थेचे अध्यक्ष प्रकाश कवठेकर यांनी जगताप कुटूंबियांना मदतीचा हात देण्याच्या हेतूने चार लाख रूपयाचा विमा कवच मिळून दिले आहे.मयत सभासद बाळू लक्ष्मण जगताप यांच्या वारसदार अनिता बाळू जगताप यांना संस्थेकडून मा.सुरेश आण्णा अपघात योजने अंतर्गत चार लक्ष रुपये मदतीचा धनादेश माजी मंत्री सुरेश धस यांच्या हस्ते शनिवारी आष्टी येथे देण्यात आला. यावेळी संस्थेचे अध्यक्ष ॲड.प्रकाश कवठेकर, युवा नेते जयदत्त धस, संचालक रामदास ठोसर, शिवाजी लोंखंडे, बाबुराव कदम, माजी सभापती रामकिसन भोंडवे, विनोद रोडे, भाऊदादा निंबाळकर, अशोक सुपेकर, पोपट कोल्हे, दादासाहेब जगताप, जनार्धन भोंडवे, संस्थेचे अधिकारी सचिन घिगे, संतोष नाटकर, गोरख पांचाळ सह आदी उपस्थित होते.

माझे पती यांचे अचानक निधन झालेले असल्याने कुटूंब उघडे पडलेले आहे. या दुखातून बाहेर निघणे शक्य नाही परंतु माझ्या लेकरांच्या भविष्याचा विचार करून तेजस अर्बन बँक आमच्यासाठी देवासारखी धावून आलेली आहे. अशावेळी मिळालेली ही मदत आमच्यासाठी खूप मोठी आहे. -अनिता जगताप, मयताची पत्नी, डोमरी.

तेजस अर्बन संस्थेने मागील कालाधवीत अनेक सामाजिक कार्यात सहभाग घेतलेला आहे. सभासद जिवंत असताना त्यांच्यासोबत संस्था असतेच परंतु दुर्देवाने काही अपघात घडलाच तरीही संस्थेने त्यांच्या कुटूंबियांच्या सोबत संस्थेने असले पाहिजे, हे तेजस अर्बनने दाखवून दिले आहे. अशाच पध्दतीने सर्व संस्थांनी विमा उतरविणे आवश्यक आहे. -मा.मंत्री.सुरेश धस, आष्टी, मतदारसंघ.

## बीड एमआयएम ( इन्क़लाब ) पक्षाचे बीड जिल्हा अध्यक्ष पदी शेख मुस्तफा याची निवड




**परळी/प्रतनिधी**

परळी शहरात ऑल इंडिया मजलीसे इन्कलाबे मिलल्त पक्षाचा कार्याकरता मेळावा संपन्न झाला,या मेळाव्यात परळी येथील सामाजिक कार्यकर्ते शेख मुस्तफा यांची MIM इन्क़लाब या पक्षाचे बीड जिल्हा अध्यक्षपदी एकमताने औरंगाबाद येथील शेख समद भाई बागवान,महाराष्ट्र कोर कमेटी सदस्य व इंखलाब पक्षाचे नेते शेख सलीम शेख मेहबूब भाई, (परभणी) यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देऊन एक मताने निवड करण्यात आली, यावेळेस नगरसेवक पठाण ताज खान सुलेमान भाई मणियार,हिदायत भाई (सायगाव) शेख मुशरफ, आयान खान, शेख शोएब, व अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

# नव्या शैक्षणिक धोरणात सर्जनशीलतेला प्राधान्य- कुलगुरु डॉ मनोहर चासकर

**नांदेड प्रतिनिधी :**

नांदेड-भोकर- नव्या शैक्षणिक धोरणात सर्जनशीलतेला प्राधान्य देणारे अभ्यासक्रम आखल्याने विद्यार्थ्यांना स्थानिक पातळीवरच रोजगाराभिमुख बनवण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत. स्थानिक प्रश्न लक्षात घेऊन ते सोडवण्याची क्षमता विद्यार्थ्यांत निर्माण व्हावी आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला पूरक असे गुणवत्ता पूर्ण उपक्रम राबवणे हे महाविद्यालयाचे यापुढे कर्तव्ये राहणार असल्याचे त्यांनी सांगितले. नवे शैक्षणिक धोरण कितीही प्रश्न निर्माण झाले, समस्या आल्या तरी त्यावर मात करून त्याची अंमलबजावणी करावीच लागणार असल्याचे त्यांनी येथील दिगंबरराव बिंदू महाविद्यालयात आयोजित नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरण संधी आणि आवाहन या विषयावर आयोजित चर्चासत्राच्या उदघाटन समारंभात बोलताना त्यांनी स्पष्ट सांगितले. यावेळी अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष माजी मंत्री डॉ माधवराव किन्हाळकर तर प्रमुख पाहुणे म्हणून सहसंचालक डॉ किरणकुमार बोंदर, विज्ञान शाखेचे अधिष्ठाता डॉ माधव पाटील,डॉ दशरथ मुंडे,मुरदसाब मांजरमकर ,प्राचार्य डॉ पंजाब चव्हाण उपस्थित होते. कुलगुरू पुढे बोलताना म्हणाले की,विद्यार्थी हा शैक्षणिक धोरणात केंद्रबिंदू आहे त्यामुळे विद्यार्थी नव्या तंत्रज्ञानाला अवगत करून आपल्या परिसरात उपलब्ध संसाधनांचा योग्य वापर करून रोजगार पूरक व्यवस्था निर्माण करू शकतो. शासकीय नौकरी,मोठ्या उद्योगातील नौकऱ्या यापुढे उपलब्ध असणार नाहीत त्यासाठी त्याच्यासमोर शेती आणि शेतीला पूरक असणाऱ्या जोड व्यवसायातून नवीन उद्योग आपल्या परिसरात उपलब्ध होणार संसाधनातून त्याला यापुढे इंडस्ट्री नव्या तंत्रज्ञानाच्या साह्याने उभी करावी लागेल त्यासाठी नवे शैक्षणिक धोरण आणि त्यातून निर्माण झालेले अभ्यासक्रम तशी संधी उपलब्ध करून देतील.तेव्हा हे उभं करताना त्याला अनेक आव्हाने समोर उभे टाकतील त्याला सामोरे जाण्यासाठी त्या विद्यार्थ्यांत हे शैक्षणिक धोरण त्याच्यात आत्मविश्वास ही निर्माण करील असे त्यांनी सांगितले. यावेळी चर्चासत्रात सहसंचालक डॉ किरणकुमार बोंदर, डॉ. माधव पाटील,डॉ डी. एन. मोरे डॉ दशरथ मुंडे, डॉ पटवारी,डॉ जोशी यांनी नव्या शैक्षणिक धोरणातील विविध पैलूंवर प्रकाश टाकणारे विचार मांडले.अध्यक्षीय समारोप डॉ माधवराव पाटील किन्हाळकर यांनी केला तर प्रास्तविक प्राचार्य डॉ पंजाब चव्हाण यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. मीरा जोशी यांनी तर आभार डॉ अरविंद चव्हाण मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी सर्व प्राध्यापक कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.




# चौसाळा येथिल साहीत्यरत्न आण्णाभाऊ साठे जयंतीच्या अध्यक्षपदी कपिल मस्के


**बीड/प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील चौसाळा येथे प्रतिवर्षाप्रमाणे याहीवर्षी छत्रपती शाहु नगर येथे लोकशाहीर साहीत्यरत्न आण्णाभाऊ साठे यांच्या सार्वजनिक जयंती निमित्त बैठकिचे आयोजन करण्यात आले होते. भाजपा अनुसुचित जाती मोर्चाचे बीड तालुका अध्यक्ष पवन कुचेकर यांच्या मार्गदर्नाखाली या बैठकिचे आयोजन करण्यात आले होते. सर्वानुमते लोकशाहीर साहीत्यरत्न आण्णाभाऊ साठे सार्वजनिक जयंतिच्या अध्यक्षपदी शाहु नगर येथिल युवा कार्यकर्ते कपिल मस्के तर उपाध्यक्षपदी रवी सोनवणे तर सचिवपदी लखन सोनवणे यांची निवड करण्यात आली या बैठकिस चौसाळा पत्रकार संघाचे अध्यक्ष विवेक कुचेकर, वंचित बहुजन आघाडीचे प्रकाश ढोकणे,एकता ग्रुपचे अध्यक्ष स्वपनील सोनवणे,जितीन काळे,आदेश बोबडे,विकास खोसे पाटील,साहील सोनवणे,विजय क्षीरसागर,कृष्णा चव्हाण,धर्मराज सोनवणे,प्रविण सोनवणे,सचिन सुरवसे पाटील,दादा गायकवाड यांच्यासह अनेक युवक मोठया संख्येने उपस्थित

# मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून गरजूवंत रुग्णांना २० लाख रुपयांची उपचाराकरिता आर्थिक मदत

**बीड : प्रतिनिधी**

मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून गरजूवंत रुग्णांना २० लाख रुपयांची आर्थिक मदत करण्यात आली आहे,यासाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षप्रमुख मंगेश चिवटे यांचे विशेष सहकार्य लाभले तसेच ॲड.कानिफ कानतोडे यांनी वेळोवेळी पाठपुरावा केला मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीतून रुग्णांना उपचाराकरिता आर्थिक मदत करण्यात आली आहे असे रुग्ण विविध हॉस्पिटलमध्ये विविध आजारांवर उपचार घेत होते परंतु त्यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत





हालाखीची असल्यामुळे हॉस्पिटलचा खर्च त्यांच्या आवाक्याबाहेर होता त्यामुळे रुग्णांच्या नातेवाईकांनी मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून त्यांना उपचाराकरिता आर्थिक मदत मिळावी यासाठी अर्ज केला होता,ॲड. कानिफ कानतोडे यांनी सदरील रुग्णांना मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीतून उपचाराकरिता आर्थिक मदत मिळवून देण्यासाठी कक्षप्रमुख मंगेश चिवटे यांच्याशी संपर्क करून रुग्णांना कशी आर्थिक मदत होईल यासाठी पाठपुरावा केला,अर्थसाह्य मिळवून देण्यासाठी मंगेश चिवटे यांचे विशेष मार्गदर्शन व सहकार्य लाभले त्यांच्या विशेष प्रयत्नातून सदरील रुग्णांना पुढील उपचारासाठी आर्थिक मदत मिळवून देण्यात आली,सदरील रुग्णांना आर्थिक मदत मिळाल्यानंतर रुग्णांच्या नातेवाईकांनी महाराष्ट्र राज्याचे संवेदनशील मुख्यमंत्री एकनाथ शिंदे,मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षप्रमुख तथा विशेष कार्यकारी अधिकारी मंगेश चिवटे,ॲड. कानिफ कानतोडे तसेच मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्षाचे सर्व सहकारी डॉ.निलेश देशमुख,स्वरूप काकडे,राहुल भालेराव,रवींद्र नन्नवरे,प्रसाद सूर्यराव,अरविंद मांडवकर,लक्ष्मण सुरवसे यांचे विशेष आभार मानले.

# बीडमध्ये साहित्यसम्राट गौरव महोत्सव दहा जेसीबीद्वारे बिंदुसरा नदीत स्वच्छता अभियान राबवून सुरुवात

## सार्वजनिक जयंती उत्सव समिती करणार सर्व खर्च

**बीड/प्रतिनिधी**

साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त बीडमध्ये साहित्यसम्राट गौरव महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. या महोत्सवाला आज सोमवार (दि.29) जुलै रोजी सुरुवात होत आहे. हा महोत्सव 1 ऑगस्टपर्यंत विविध उपक्रम राबवून पार पडणार आहे. दरम्यान दहा जेसीबीच्या साह्याने बिंदुसरा नदीपात्र स्वच्छ करुन या महोत्सवाला सुरुवात होत आहे. अशी माहिती साहित्यसम्राट गौरव महोत्सवाचे समन्वयक अजिंक्य चांदणे,उत्सव समिती अध्यक्ष सुशिलाताई मोराळे यांनी प्रसिद्धी पत्रकातून दिली. बीड शहरामध्ये साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे सार्वजनिक जयंती उत्सव समिती यांच्याकडून साहित्यसम्राट गौरव महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. महाराष्ट्र राज्याला आदर्श निर्माण करून देईल असा महोत्सव दरवर्षी साजरा केला जातो. त्या अनुषंगाने या वर्षी देखील जयंती उत्सव समितीकडून विविध उपक्रम राबविले जाणार आहेत. साहित्यसम्राट गौरव महोत्सवातील सर्व उपक्रमांना नागरिकांनी मोठ्या संख्येने



उपस्थित रहावे. असे आवाहन डीपीआयचे प्रदेशाध्यक्ष तथा जयंती उत्सव समितीचे समन्वयक अजिंक्य चांदणे यांनी केले आहे.

असे होणार कार्यक्रम..!

साहित्यसम्राट गौरव महोत्सवात सोमवार (दि.29) जुलै रोजी सकाळी 11 वाजता बिंदुसरा नदीपात्र येथे दहा जेसीबीद्वारे स्वच्छता अभियान. मंगळवार (दि. 30) जुलै रोजी गायरान धारक शेतकऱ्यांना फवारणी पंपाचे वाटप, सायंकाळी 5 वाजता पाचशे महिलांना साड्या वाटप वाटपाचा कार्यक्रम अण्णाभाऊ साठे सांस्कृतिक भवन चांदणेवाडा येथे होणार आहे.तर बुधवार (दि.31) जुलै रोजी तिनशे विद्यार्थ्यांना मोफत दप्तर वाटप केले जाणार आहे.

अशी निघणार मिरवणूक

साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त गुरुवार (दि.1) ऑगस्ट रोजी सकाळी 8 वाजता काळा हनुमान ठाणा ते लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौक इथपर्यंत साहित्य दिंडी निघणार आहे. सायंकाळी 5 वाजता भव्य अशी मिरवणूक काढली जाणार आहे.

# नांदेड जिल्ह्याच्या सन २०२४-२५ च्या ७४९ कोटींच्या आराखड्याला डीपीसीची मंजूरी

**नांदेड प्रतिनिधी :** नांदेड : जिल्हा वार्षिक योजनेच्या सर्वसाधारण, अनुसूचित जाती उपयोजना, आदिवासी उपयोजना या तीनही योजना मिळून शासनाकडून मंजूर ७४९ कोटी रुपयांच्या वार्षिक आराखड्याला आज जिल्हा नियोजन समिती (डीपीसी) ने मंजुरी दिली. राज्य शासनाच्या पथदर्शी योजनांना वेळेत पूर्ण करण्यासोबतच शिक्षण, आरोग्य, वीजपुरवठा, पाणीपुरवठा या प्रश्नाकडे गांभीर्याने बघण्याचे निर्देश राज्याचे ग्रामविकास, पर्यटन मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री गिरीश महाजन यांनी दिले.

नांदेड जिल्हा नियोजन समितीची बैठक २७-जुलैला सकाळी ११ वा. कै. डॉ. शंकरराव चव्हाण, नियोजन भवन, मुख्य सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड येथे आयोजित करण्यात आली होती. दोन तासांवर चाललेल्या बैठकीत राज्य शासनाच्या पथदर्शी योजनांचा लाभ जनतेला सुलभ पद्धतीने होईल, यासाठी प्रयत्न करण्याचे आदेश त्यांनी यावेळी उपस्थित अधिकाऱ्यांना दिले.

या बैठकीस माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोक चव्हाण, खासदार डॉ.अजित गोपछडे, खासदार वसंतराव चव्हाण, खासदार नागेश पाटील आष्टीकर, खासदार डॉ. शिवाजी काळगे, आमदार राम पाटील रातोळीकर, आमदार विक्रम काळे, आमदार भीमराव केराम, आमदार माधवराव पाटील जवळगावकर, आमदार डॉ. तुषार राठोड, आमदार बालाजी कल्याणकर, आमदार मोहनराव हंबर्डे, आमदार श्यामसुंदर शिंदे, आमदार राजेश पवार, आमदार जितेश अंतापुरकर, जिल्हाधिकारी अभिजीत राऊत, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करणवाल, जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, मनपा आयुक्त डॉ. महेश डोईफोडे, जिल्हा नियोजन अधिकारी सुधाकर आडे तसेच जिल्हा



नियोजन समितीचे विशेष निमंत्रित सदस्यांसह विविध विभाग प्रमुखांची उपस्थिती होती.

सुरूवातीला ८-जानेवारी २०२४ रोजी झालेल्या जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीच्या इतिवृत्ताच्या अनुपालनास यावेळी मान्यता देण्यात आली. तसेच सन २०२३-२४ या आर्थिक वर्षासाठी गेल्या मार्च महिन्यात झालेल्या खर्चाला बैठकीमध्ये मान्यता घेतली गेली. गेल्या वर्षीच्या वार्षिक नियोजनात जिल्ह्यातील विविध विकास कामावर जिल्हा वार्षिक योजनेतून ६५९ कोटी खर्च झाले आहे.९९.९९ टक्के अशी ही खर्चाची आकडेवारी आहे .

जिल्हा वार्षिक योजना सर्वसाधारण,अनुसूचित जाती उपयोजना, आदिवासी उपयोजना अशा एकत्रित जिल्हा वार्षिक योजनेच्या २०२४-२५ आर्थिक तरतुदीच्या विनियोजनाबाबत बैठकीत चर्चा करण्यात आली. २०२४-२५ या वर्षासाठी ७४९ कोटीची तरतूद मंजूर असून त्यापैकी शासनाकडून २३१ कोटी निधी प्राप्त झाला आहे. जुलै अखेरपर्यंत वितरित झालेला निधी व झालेला खर्च याबाबतचा आढावा आज घेण्यात आला.

या बैठकीत आतापर्यत जिल्ह्यात झालेले पावसाचे प्रमाण, धरणातील पाणीसाठा, जिल्ह्यातील रस्त्याच्या कामांची सद्यस्थिती, तसेच अर्धवट रस्त्यांच्या कामांना निधी उपलब्ध करुन मिळण्याबाबत, हर घर जल योजनेत घराघरात पाणी पोहोचण्याबाबत सुरुवातीला चर्चा झाली. त्यानंतर बैठकीमध्ये लोकप्रतिनिधीनी काही प्रमुख समस्यांवर सभागृहात उपस्थित अधिकाऱ्यांचे लक्ष वेधले.

## जालना जिल्हा पोलीस दलात मोठ्या प्रमाणात फेरबदल, सय्यद मजहर घनसावंगी ठाण्याचे पोलिस निरिक्षक

## जिल्ह्यातील ३१ पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्या

**जालना/प्रतिनिधी** जालना जिल्हा पोलीस दलात मोठ्या प्रमाणात फेरबदल करण्यात आले आहेत. जिल्ह्यातील ३१ पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आले असून पोलिस निरिक्षक सय्यद मजहर यांची घनसावंगी ठाण्याचे पोलिस निरिक्षक म्हणून नेमणूक करण्यात आली आहे. सदर बाजार पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक पंकज यांची स्थानिक गुन्हे शाखेत वर्णी लागल्यामुळे त्यांच्या जागी नियंत्रण कक्षातील पोलीस निरीक्षक संदीप भारती यांची नेमणूक करण्यात आली आहे. शहर वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक गुणाजी शिंदे यांची सायबर पोलीस ठाण्यात बदली झाली असून, त्याठिकाणी नियंत्रण कक्षातील जनार्धन शेवाळे यांची नेमणूक करण्यात आली आहे. स्थानिक गुन्हे शाखेसाठी गेल्या काही वर्षांपासून चर्चेत असलेले पोलीस निरीक्षक किरण बिडवे यांची भोकरदन पोलीस ठाण्यात नेमणूक करून बोळवण करण्यात आली आहे. जिल्हा विशेष शाखेतील पोलीस निरीक्षक सय्यद मजहर यांची घनसावंगी पोलीस ठाण्यात नेमणूक करण्यात आली आहे. जिल्ह्यातील अनेक सहाय्यक पोलीस निरीक्षक आणि पोलीस उपनिरीक्षक यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. तर बाहेरील जिल्ह्यातून बदलून आलेल्या अधिकारी यांना नेमणुका देण्यात आल्या आहेत.

# अखिल महाराष्ट्र उर्दू शिक्षक संघटनेच्या वतीने आ. टोपेंचा सत्कार

**जालना/प्रतिनिधी**

जालना जिल्हा परिषदेच्या उर्दू माध्यमांच्या शाळांमध्ये ९ वीचे वर्ग सुरु करण्याबाबत परवानगीचे आदेश निर्गमित करण्यासाठी माजी आरोग्यमंत्री तथा आमदार राजेशभैय्या टोपे यांनी खंबीर नेतृत्व करुन या कामासाठी त्यांनी स्वत: आढावा घेवून जिल्ह्यातील अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हितासाठी व उज्वल भविष्यासाठी उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल अखिल महाराष्ट्र उर्दू शिक्षक संघटनेच्या वतीने आ. राजेशभैय्या टोपे यांचा सत्कार करण्यात आला. जालना जिल्ह्यातील राहिलेले



जामखेड, परतुर, अंबड, पारध, मंठा येथे ९ वी व जाफ्राबाद येथे ११ वीचे वर्ग सुरु करण्याबाबत येथील शाळांच्या प्रस्तावात काही त्रुटी असल्यास त्रुटीच्या पूर्ततेसाठी आदेश देऊन राहिलेल्या शाळांनाही याच वर्षी वर्ग वाढीसाठी आदेश निर्गमित करण्यासाठी आपण संबधितांना सुचना द्यावी अशी मागणी अखिल महाराष्ट्र उर्दू शिक्षक संघटनेच्या वतीने करण्यात आली. यावेळी आ. टोपे यांनी मुस्लिम समाजाच्या हितासाठी व विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी या प्रकरणात स्वतः लक्ष देऊन वर्गवाढ आदेश निर्गमित करण्यासाठी शिफारसपत्र देऊन स्वतः पाठपुरावा करून पुर्ण प्रयत्न करण्याचे आश्वासन संघटनेच्या शिष्टमंडळाला दिले. तसेच या उत्कृष्ट कार्यासाठी अखिल महाराष्ट्र उर्दू शिक्षक संघटनेच्या वतीने आ. टोपे यांचे आभार व्यक्त करण्यात आले. यावेळी अखिल महाराष्ट्र उर्दू शिक्षक संघटनेचे जिल्हाध्यक्ष जावेद खान, सचिव शेख अहेमदुल्लाह, कार्याध्यक्ष इलियास मोहियोद्दीन, उपाध्यक्ष तालेब कुरेशी, शेख जावेद, अब्दुल मुकीत, सहसचिव रियाज खान, मोहम्मद आवेज इम्रान, प्रसिद्धी प्रमुख इकबाल अन्सारी, एजाज कुरेशी आदी उपस्थित होते.

## मुस्तापूर येथील जि प प्रा शाळेच्या शिक्षण सप्ताहाची सांगता गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार व महाप्रसादानी झाली

**नायगांव/प्रतिनिधी**

नायगांव तालुक्यातील मुस्तापूर येथील जि प प्रा शाळा येथे २२ जुलै २०२४ पासून ते २८ जुलै २०२५ पर्यंत शिक्षण सप्ताह जिल्हा नांदेड च्या वतीने जिल्हाभर राबवण्यात आला होता यात २२ जुलै अध्ययन व अध्यापक यावर विद्यार्थ्यांना टि एल एम डे म्हणून साजरा करण्यात आला २३ जुलै रोजी मूलभूत संख्याज्ञान व साक्षरता, २४ क्रीडा दिवस, सांस्कृतिक दिवस,२५ कौशल्य डिजिटल,, २६ मिशन लाईफ,२७ इको क्लब उपक्रम, सामुदाय सहभाग दिवस या दिवशी शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तक पेना देऊन व शालेय साहित्याचे वाटप करून सर्व विद्यार्थ्यांचा सन्मान व पुरस्कार प्रदान करण्यात आले यावेळी जि



प शाळेचे मुख्याध्यापक चंद्रकांत पिलाजी सर कर्तव्यदक्ष उत्कृष्ट शिक्षक तोटावाटर सर शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष उमाकांत जाधव, सामाजिक कार्यकर्ते तथा माजी शिक्षण समिती सदस्य दत्ताहारी जी जाधव शिवाजी बोईनवाड शिवानंद जाधव यासह शाळेतील विद्यार्थी व पालक उपस्थित होते यावेळी शाळेचे मुख्याध्यापक चंद्रकांत पिलाजी सर यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला त्यांना शुभेच्छा देण्यासाठी गावातील पालक शिक्षक प्रेमी व विद्यार्थी शुभेच्छा दिल्या गावकऱ्यांच्या वतीने उत्कृष्ट शिक्षक म्हणून तोटावार सर व चंद्रकांत पिलाजी सर यांचा सत्कार करण्यात आला यावेळी व्यासपीठावर सर यांनी विचार मांडले तर दत्ताहारी जाधव उमाकांत जाधव यांनीही विचार मांडले कार्यक्रमाचे संचलन तोटावार सर तर आभार दत्ताहारी जाधव यांनी मानले शिक्षण सप्ताहाची सांगता महाप्रसादाने झाली

# साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त बदामराव पंडितांच्या उपस्थितीत रक्तदान शिबिर

**गेवराई/प्रतिनिधी**

लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त गेवराई शहरात जयंती उत्सव समितीच्या वतीने शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांच्या उपस्थितीत रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते यावेळी रुग्णांना फळे वाटपही करण्यात आली.

गेवराई शहरातील साठे चौक येथे लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी शिवसेना उद्धव




बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते माजी राज्यमंत्री बदामराव पंडित माजी नगराध्यक्ष ब्रह्मदेवा धुरंदरे, किरण जाधव, रजनी भैय्या सुतार, ललित सुतार, महादेव पाटोळे, सुनील कांडेकर यांची प्रमुख उपस्थिती होती. विशाल जिजा थोरात, विजय सुतार, अक्षय पवार, उज्वल सुतार, गजानन हातागळे, विशाल घोडे, संदीप सुतार, विजय सुतार आदींनी उपस्थित यांचे स्वागत केले. याप्रसंगी बोलताना माजी राज्यमंत्री बदामराव पंडित म्हणाले की साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांनी समाजप्रबोधनासाठी केलेले कार्य समाज कधीही विसरणार नाही. त्यांच्या साहित्यामध्ये समाजातल्या प्रत्येक घटकाला क्रांतीची जाणीव करून देणारी ऊर्जा मिळते. त्यांच्या जयंतीनिमित्त गेवराई शहरात भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करून गरजवंत रुग्णांसाठी रक्त पिशव्या उपलब्ध करून दिल्याबद्दल संयोजकाचे कौतुक करावे तेवढे कमी असल्याचे सांगून यापुढेही सर्व समाज बांधवांनी एकत्र येऊन समाज सुधारक आणि राष्ट्रपुरुषांच्या जयंती उत्साहात साजरा कराव्यात असे आवाहन केले. याप्रसंगी तरुण मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# केज तालुक्यात नशाखोर झोपडपट्टी दादाचा सुळसुळाट !

## केज मधे एका व्यापाऱ्यावर जीवघेणा हल्ला

**केज/प्रतिनिध**


केज:-अंबाजोगाई रस्त्या वरील पिसेगाव फाटा येथे एका व्यापाऱ्यास पाच जणांनी लोखंडी रॉड व कोयत्याने मारहाण करीत सोन्याची चैन,अंगठी असा ७५ हजार रुपयांचा ऐवज बळजबरीने काढून घेतल्याची घटना घडली आहे. व्यापारी महासंघाचे अध्यक्ष महादेव सूर्यवंशी यांचे लहाने बंधू व्यापारी ज्ञानेश्वर शिवाजी सुर्यवंशी वय ३८ वर्षे यांचे केज शहरात मुख्य रस्त्यावर श्री व्यंकटेश एजन्सी कृषी मशिनरीचे दुकान आहे.दि. २५




जुलै रोजी रात्री ८-०० वाजता दुकान बंद करून दुचाकीवरून गावाकडे निघाले होते.ते केज – अंबाजोगाई रस्त्यावर पिसेगाव फाटा येथे वळत असताना पिसेगाव फाट्या वर लावलेल्या बॅनरचे पाठीमागे पाच अनोळखी इसम तोंडाला काळ्या रंगाच्या मफलर बांधून उभे होते.त्यातील एका इसमाने पाठीमागून लोखंडी रॉडने डोक्यात मारून गंभीर दुखापत केली.दुसऱ्या इसमाने त्याच्या हातातील लाकुड त्यांच्या दुचाकीच्यापुढच्या चाकात घातले.त्यामुळे ते दुचाकीवरून खालीपडले. त्या पाच जणांमध्येत्यांच्या भावकीतील ओळखीचा रवी दत्तात्रय सुर्यवंशी हा दिसल्याने ते त्यास मीतुला ओळखतो असे म्हणताच रवी सूर्यवंशी याने हातातील कोयत्याने त्यांच्या डोक्यात मारून दुखापत केली. तुला आता जिवच मारून टाकतोअसे म्हणत त्यांच्या पाठीवरील बॅग हिसकावून घेत असताना दुसऱ्या अनोळखी इसमांनी त्यांच्या गळ्यातील ६० हजार रुपये किंमतीची दोन तोळ्याची सोन्याची साखळी व १५ हजार रुपये किंमतीची पाच ग्रॅम ची अंगठी हिसकावून घेतली.त्यांनी आरडाओरडा करताच ते सर्व जण पळून गेले. त्यांचा ओरडण्याचा आवाज ऐकून मदतीला धावून आलेल्या भास्कर त्रिंबक नेहरकर,संजय व्यंकट सुर्यवंशी,राहुल कुंडलीक चाटे यांनी त्यांना उपचारासाठी केजच्या उप जिल्हा रुग्णालयातदाखल केले.प्रथमोपचार करून पुढील उपचारासाठी अंबाजोगाईच्या स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयात पाठविले.सूर्यवंशी यांच्या डोक्याला गंभीर मारअसून सात ते आठ टाके घेण्यात आले आहेत.तसेच पायांनाही मार लागला आहे.दरम्यान दि.२७ जुलै रोजी व्यापारी ज्ञानेश्वर सूर्यवंशी यांनी दिलेल्या तक्रारीवरून रवी सुर्यवंशी सह अनोळखी चार इसमां विरुद्ध केज पोलिसात गुन्हा दाखल झाला आहे. एकूणच घडलेल्या प्रकारा मुळे व्यापारी वर्गात भिती चे वातावरण पसरले आहे .

## नेमबाज मनु भाकरचा देशवासीयांना सार्थ अभिमान..!

### मुख्यमंत्री एकनाथ शिदे यांच्याकडून अभिनंदन



प्रतिनिधी पॅरिस ऑलिंपिक २०२४ मध्ये भारतीय चमुसाठी पदकाचे खाते उघडून नेमबाज मनु भाकरने एक चांगली सुरुवात केली आहे. यातून भारतीय खेळाडू प्रेरणा घेतील आणि देशासाठी पदकांची लयलूट करतील असा विश्वास व्यक्त करत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मनु भाकरचे अभिनंदन केले आहे. महिला नेमबाज मनु भाकरने १० मीटर एअर पिस्तुल नेमबाजीमध्ये कांस्य पदक पटकावून या स्पर्धेतील भारतासाठी पहिले पदक मिळवले आहे. नेमबाज मनु भाकरची ही कामगिरी तमाम देशवासियांसाठी सार्थ अभिमानाची असल्याची भावना व्यक्त करत मुख्यमंत्र्यांनी तिचे मन:पूर्वक अभिनंदन केले आहे. तिला स्पर्धेसाठी तसेच नेमबाजीतील पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# जालना तालुक स्तरीय शालेय स्पर्धा पुर्व नियोजन बैठक संपन्न

**जालना/प्रतिनिधी**

क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा परीषद जालना व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय यांच्या वतीने आयोजित करण्यात येणाऱ्या जालना तालुका स्तरीय शालेय स्पर्धा सन २०२४-२५ चे आयोजन करण्यात येणार आहे. यासाठी जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा क्रीडा संकुल जालना या ठिकाणी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी क्रीडा अधिकारी डॉ. रेखा परदेसी, क्रीडा अधिकारी श्रीमती



आरती चिल्लारे, क्रीडा संघटक प्रशांत नवगीरे, क्रीडा संघटक शेख चाँद पी.जे., मुख्याध्यापक सुभाष पारे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी तालुका स्तरावर आयोजित करण्यात येणाऱ्या कबड्डी, खो खो, व्हॉलीबॉल, योगासन, बुद्धीबळ, कॅरम, मैदानी, क्रिकेट, कुस्ती, फुटबॉल आदी खेळांच्या तारखा व ठिकाणांच्या बाबतीत चर्चा करण्यात येऊन तालुका स्पर्धांचा कार्यक्रम लवकरच जाहीर करावा असे ठरविण्यात आले. यावेळी जालना तालुका संयोजक म्हणून क्रीडा संघटक शेख चाँद पी.जे. यांची निवड करण्यात येऊन तशी घोषणा जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर यांनी केली. घोषणेला उपस्थित असलेल्या सर्व क्रीडा शिक्षकांनी टाळ्या वाजवून अनुमोदन दिले. सदर बैठकीला तालुक्यातील सर्वश्री सचिन आर्य, विजय गाडेकर, सोपान शिंदे, एस.जी. राजकर, आर.पी. काळे, ए.जे. झाल्टे, एच.ए. ढगे, अशोक एन. शिंदे, सचिन आर. टेकुर, शेख समीर, संतोष आर. वाघ, गणेश गायके, संतोष एस. एस., अजहर खान, डॉ. नितीन भक्त, गोवर्धन वाहुळ, रविंद्र ढगे, मो. यासीन बागवान, ए.एस. शिंदे, डॉ. तुलजेश भुरेवाल, आर.एम. सारस्वत, सय्यद निसार, धारे ए.एम., प्रतिक आगळे, घारे सर, सपकाळ सर आदिंची उपस्थिती होती. सभेचे सुत्र संचालन क्रीडा अधिकारी डॉ. रेखा परदेसी यांनी तर आभार प्रदर्शन शेख चाँद पी.जे. यांनी केले.

# सामान्यांना भेटला वाली खा.सोनवणेंच्या जनता दरबारातून खणखणले अधिकाऱ्यांचे फोन

## पवनसुत निवासस्थानी भरवला जनता दरबार, सर्वाधिक तक्रारी महावितरण विभागाच्या

**बीड/प्रतिनिधी**

शासकिय कार्यालयात चकरा मारूनही काम होत नाही. ज्यांची कोणी दखलही घेत नाही, अशा गरजवंतांना खा.बजरंग सोनवणेंच्या रूपाने वाली भेटला आहे. रविवारी खा.बजरंग सोनवणे यांनी पवनसुत निवासस्थानी जनता दरबाराचे आयोजन केले होते. पहिल्याच जनता दरबारात नागरिकांच्या रांगा लागल्या. यावेळी अडलेली आणि राजकीय द्वेषातून अडवलेली कामे मार्गी लावण्यासाठी जनता दरबारातून अधिकाऱ्यांचे फोन खणखणले. खा.बजरंग सोनवणे यांनी निवडून आल्यानंतर प्रशासकिय पातळीवर महामॅरोथॉन बैठका घेवून प्रलंबित कामांचा आढावा घेतला. रेल्वेसारख्या महत्वाच्या प्रश्नावर शपथ घेण्याआधी बैठक घेवून या प्रकल्पाची काय स्थिती आहे, हे जाणून घेतले. यानंतर त्यांनी दिल्लीत जाऊन शपथ घेतली. दरम्यान, आता



दिल्लीतून परतल्यानंतर विविध तालुक्यांच्या ठिकाणी जाऊन अधिकाऱ्यांकडून आढावा घेतला जात आहे.शनिवारी राष्ट्रवादी काँग्रेसच्या निष्ठावंत कार्यकर्त्यांचा मेळावा आटपून ते रात्री उशीरा केजमध्ये पोहचले. यानंतर त्यांनी सुर्योदय होण्याच्या वेळीच आज जनता दरबार असल्याचे केजमध्ये कळविले. सकाळी ९ वाजता जनता दरबारला सुरूवात झाली. तर सायंकाळी ४.३० पर्यंत हा जनता दरबार सुरू होता. यावेळी नागरिकांनी आपले प्रश्न घेवून अक्षरश: रांग लावली होती. यात महावितरणकडून अडवणूक होत असल्याचे गाऱ्हाणे सर्वाधिक नागरिकांचे होते. त्याच बरोबर पिण्याच्या पाण्याचे प्रश्न आणि शाळांसाठी येणाऱ्या अडचणीही नागरिकांनी मांडल्या. खा.बजरंग सोनवणे यांनी प्रश्न घेवून आलेल्या नागरिकांचे जागीच समाधान करण्याचा प्रयत्न केला. रविवारची सुट्टी असतानाही संबधित अधिकाऱ्यांना फोन लावून दोन दिवसात कामे मार्गी लावण्याच्या सुचना दिल्या. शिवाय आलेल्या सर्वांचे निवेदने स्विकारून संबधित अधिकाऱ्यांना हे निवेदन कार्यवाहीस्तव पाठविण्याची व्यवस्थाही केली. यावेळी जिल्हा पोलीस अधिक्षक, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड, उप अभियंता महावितरण धारूर, कार्यकारी अभियंता सार्वजनीक बांधकाम विभाग आष्टी विभाग २ या अधिकाऱ्यांशी फोनवरून चर्चा केली. पवनसुत निवासस्थानी जनता दरबाराचे आयोजन केले होते. या दरम्यान, हजारो नागरिकांच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचा प्रयत्न केला. कित्येकांचे प्रलंबित प्रश्न तात्काळ साडवले. हा जनता दरबार कायम सुरू राहिल. लोकांच्या सेवेत २४ तास काम करण्याचा निश्चय मी केला आहे. नागरिकांच्या प्रश्नांचे होणारे निराकरण माझ्या जनसेवेची सगळ्यात मोठी शिदोरी आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077